International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 3 Jan-Feb 2024

# महात्मा फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य

**ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
संशोधक विद्यार्थिनी, (BSc, MA. , NET)
**Corresponding Author – ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
**Email:** aishwaryaballal18@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14196458**

**प्रस्तावना:**

जोतीराव गोविंदराव फुले म्हणजेच महात्मा फुले या नावाने लोकप्रिय असणारे समाजसुधारक हे महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, जातिविरोधी समाजसुधारक आणि लेखक होते. त्यांचे मुळगाव कटगुण (सातारा) होते. पण त्यांचा जन्म धनकगडी- पुणे येथे ज्योतिबाच्या यात्रे दिवशी झाला, म्हणून हे नाव ठेवले. त्यांचे मूळ आडनाव गोऱ्हे होते, पण वडील फुले विकायचे म्हणून फुले आडनाव पडले. त्यांचे प्राथमिक शिक्षण १८३४-१८३८ मध्ये पंतोजीच्या शाळेत झाले. नंतर वडीलांनी त्यांचे शिक्षण बंद केले व त्यांच्या फुलांच्या व्यवसायात गुंतवले. पुढे उर्दू शिक्षक गफारबेग मुन्शी व मि. लिजीट यांच्या समजवण्याने त्यांच्या शिक्षणाची पुन्हा सुरुवात झाली. स्कॉटिश मिशनऱ्याच्या शाळेत माध्यमिक शिक्षण घेताना त्यांना काही मित्र मिळाले ज्यांचा फुलेंच्या सामाजिक कार्यात मोलाचा वाटा आहे. वयाच्या तेराव्या वर्षी नायगाव येथील खंडोजी नेवसे (झगडे पाटील) यांच्या ९ वर्षाच्या कन्या सावित्रीबाई यांच्याशी विवाह झाला. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले हे दोघेही भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहे. जोतिरावांनी १८४८ मध्ये पुण्यात तात्यासाहेब भिडे यांच्या भिडेवाडा येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. खालच्या समजल्या जाणाऱ्या जातींमधील लोकांना समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्वाची व्यक्ती म्हणून फुलेंची ओळख आहे. त्यांना १८८८ मध्ये त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विठ्ठलराव वडेकर यांनी सन्माननीय 'महात्मा' ही पदवी प्रदान केली होती.

**उदिष्ट्ये:**

- महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.
- महात्मा फुले यांच्या सामाजिक सुधारणांवर प्रकाश एकणे.
- महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची माहिती घेणे.
- महात्मा फुले यांनी समाज प्रबोधनासाठी प्रकाशित केलेल्या पुस्तकांबददल माहिती जाणून घेणे.

महात्मा फुले यांना पुढील व्यक्ती व ग्रंथांमधून अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळाली :

थॉमस पेन यांनी लिहिलेले 'द राईट ऑफ मॅन', 'जस्टिस अॅन्ड ह्युमॅनिटी', 'एज ऑफ रिजन', 'कॉमन सेन्स'. त्याचबरोबर छ.शिवाजी महाराज, मार्टिन ल्युथर, कबीर यांचा 'विप्रमती' ग्रंथ, संस्कृत 'वज्रसूची' या सर्वांचा प्रभाव महात्मा फुलेंवर पडला.

**समाजकार्याकडे जाण्याचा महात्मा फुलेंचा निर्णय :**

इ.स.१८४८ मध्ये ज्योतिबा व त्यांचे मित्र सदाशिव बल्लाळ गोवंडे या ब्राम्हण मित्राच्या लग्नास गेले असता त्यांच्या वरातीमध्ये ब्राम्हण वर्गाकडून अपमान झाला. एक माळयाचा मुलगा म्हणून त्यांना हिनवले गेले. ते सहन न झाल्याने त्यांनी समाजसुधारणा करण्याचे ठरवले. त्याचबरोबर आणखी एक घटना निर्णयात्मक ठरली. त्यांच्या गुरुकन्येला नवव्या वर्षी वैधव्य प्राप्त झाले व तिचे केशवपन करुन तिला विद्रूप करण्यात आले. या घटनेमुळे त्यांच्या मनावर खूप आधात झाला. परिणामी ते समाजसुधारणेकडे वळले.

**महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य:**

महात्मा फुलेंनी शिक्षणाची प्रेरणा अहमदनगरच्या मिस फरार यांच्याकडून घेतली आणि स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. १ जानेवारी १८४८ या दिवशी पुण्यातील बुधवार पेठेतील तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. मुलींसाठी स्वतंत्रपणे शाळा सुरु करणारे फुले हे पहिलेच व्यक्ती होते. या शाळेत शिकवण्याची जबाबदारी सावित्रीबाई फुलेंवर दिली. सावित्रीबाईंनी शाळेत शिक्षिका म्हणून काम सुरु केल्यानंतर सनातन्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. शेण, दगड यांचा मारा त्यांच्यावर झाला. तरीही त्यांनी न डगमगता आपले कार्य सुरु ठेवले. सुरुवातीला फक्त सहाच मुली शाळेत आल्या. या दोघांचे हे कार्य जोतिबांच्या वडिलांना न पटल्याने त्यांनी त्यांना घराबाहेर काढले. घरातून बाहेर काढल्यानंतर पुण्यातील गंजपेठेत राहणारे मित्र उस्मान शेख यांनी जोतिबांना राहण्यास जागा दिली. उदरनिर्वाहासाठी त्यांनी कापड शिवण्याचे दुकान, बांधकाम - गवंडी व्यवसाय केले.

सावित्रीबाईंनी घोंगड्या शिवून पैसे कमावून संसार केला. याकाळात काही दिवस शाळा बंद केली.

बंद पडलेली शाळा पुन्हा मोरो विठ्ठल वाळवेकर यांच्या आर्थिक मदतीने अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यात सुरु झाली. पुढे १८५१ मध्ये नानापेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरु केली. १८५१ मध्ये रास्ता पेठेत मुलींची दुसरी शाळा सुरु केली. १८५२ मध्ये पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटिशांनी ब्राम्हणांना देण्यात येणारी दक्षिणा बंद केली. त्याचा दक्षिणा प्राईन फंड बनविला. त्यातील सर्व पैसा स्त्री शिक्षणासाठी मदत म्हणून दरमहा २५ रु. महात्मा फुलेंना मेजर कॅन्डी यांच्या हस्ते विश्रामबाग वाड्यात सत्कार करुन देण्यात आला. १८५२ मध्ये वेताळपेठेत मुलींची तिसरी शाळा सौ.ई.सी.जोन्स यांच्या मदतीने सुरु केली. १८५२ मध्येच वेताळपेठेत अस्पृश्यांसाठी शाळा सुरु केली.

१८५२ मध्ये दलितांसाठी पहिले वाचनालय सुरु केले. जोतिबांनी स्कॉटीश मिशनरी शाळेत काही काळ शिक्षक म्हणून काम केले. १८५८मध्ये अस्पृश्यांसाठी तिसरी शाळा सुरु केली. त्यांनी १८८२ मध्ये आलेल्या हंटर कमिशन समोर साक्ष दिली होती. त्यावेळी त्यांनी १२ वर्षाखालील मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करा असे वृत्त दिले.

**महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य:**

फुलेंनी एकदा विधवा स्त्रीला व्यभिचारातून गर्भधारणा झाल्यामुळे आत्महत्या करताना पाहिले होते. तेव्हा त्यांनी यावर उपाय म्हणून नको असलेल्या बालकांना सांभाळण्यासाठी १८६३ मध्ये भारतातील पहिल्या बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. याच गृहातील यशवंत नावाच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले. पंढरपूर येथे या गृहाची शाखा काढली.

१८६४ मध्ये जोतिबांनी पुण्यात शेणवी जातीतील रघुनाथ जनार्दन यांचा नर्मदा विधवेशी पुनर्विवाह करुन दिला. १८६५ मध्ये विधवांचे केस कापले जावू नयेत म्हणून तळेगाव ढमढेरे येथे न्हाव्यांचा संप केला. १८६८ मध्ये अस्पृश्यांसाठी पाण्याचा हौद खुला केला. अस्पृश्यांसाठी सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्यावर असलेली बंदी मोडीत काढली.

**शेतकऱ्यांसाठी लढा :**

सावकरांच्या जुलुमशाहीमुळे शेतकऱ्यांवर खूप अन्याय होत होता. त्याविरुद्ध फुलेंनी आवाज उठवला. १८७५ मध्ये जुन्नर व नगर भागात खतफोडीचे बंड सुरु केले. शेतकऱ्यांना एकत्र आणून आंदोलन सुरु केले. 'नांगर चालणार नाही, जमीन पिकणार नाही' असा नारा दिला. १८७९ मध्ये शेवटी सरकारला 'डेक्कन ॲग्रीकल्चर कायदा' पास करावा लागला. १८७७ मध्ये दुष्काळ पडला होता. तेव्हा त्यांनी धनकवाडीत कॅम्प घेतला. १८८५ मध्ये जोतिबांनी एक चित्र तयार करुन त्यांच्या हजारो प्रति शेतकऱ्यांना वाटल्या. या चित्रास त्यांनी 'सुधारणेचे झाड' असे नाव दिले. या चित्रात त्यांनी 'झाड' हे शेतकऱ्यांच्या डोक्यावर उगवलेले असून, त्याची फळे मात्र शेटजी, सावकार, सत्ताधारी हे वर बसून खात आहेत व त्यांच्या भाराने शेतकरी वाकला आहे असे दाखवले. १८८८ ड्युक ऑफ कॅनॉट हा भारत भेटीवर आलेला तेव्हा जोतिबा शेतकऱ्यांच्या वेशात उपस्थित राहिले होते. १८८९ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसच्या सभेमध्ये अधिवेशनाच्या प्रवेशद्वारावर शेतकऱ्यांचा ३० फूट उंच गवती पुतळा उभारुन शेतकऱ्यांचे दैन्य राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या निदर्शनास आणले.

**महात्मा फुलेंचा सत्यशोधक समाज:**

मानवता: बुध्दीप्रामाण्यवाद व व्यक्तीस्वातंत्र्याच्या आधारावर २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाने ब्राम्हणांच्या समाजातील वर्चस्वाविरुद्ध लढा दिला. समाजातील जातीभेद कमी करण्याचा प्रयत्न केला.

**ब्रीदवाक्य:**

'सर्व साक्ष जगत्पती। त्याला नकोस मध्यस्थी ॥

सर्व मानव ईश्वराची लेकरं ।

ईश्वर एकच, निर्गुण निराकार ॥

**सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे स्वरुप:**

१. परिवर्तनीय चळवळ
२. वर्गीय चळवळ
३. कृतीशिल चळवळ

**सत्यशोधक समाजाच्या चळवळीची तत्वे :**

१. ईश्वर एकच असून तो निर्गुण निराकार आहे.
२. मनुष्य जातीने नाही तर गुणानी श्रेष्ठ आहे.
३. परमेश्वराला भेटण्यास मध्यस्थीची गरज नाही.
४. पुनर्जन्मः कर्मकांड, जपजाप्य इ. अज्ञानमूलक आहे.
५. कोणताही धर्मग्रंथ ईश्वराने निर्माण केलेला नाही, तर तो मानवाने निर्माण केला आहे.

**सत्यशोधक समाजाची उदिष्ट्ये**

१. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी समूळ नष्ट करणे.
२. कनिष्ठ जातींच्या लोकांची ब्राम्हण पुरोहितापासून पिळवणूक बंद करणे.
३. सामाजिक समतेचा पुरस्कार करणे.
४. शुद्रातिशुद्रांना मानवी हक्काची शिकवणूक देणे.
५. बहुजन समाजाला वैचारिक जागृती देणे:

**सत्यशोधक समाजाचे कार्य:**

या समाजात सर्व जातींच्या लोकांना सदस्यत्व दिले. समाजाने जातिभेद, उच्चनीचता, मूर्तिपूजा यांविरुद्ध जोरदार प्रचार केला. त्यांनी शिक्षण प्रसारावर भर दिला. समाजाने वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धाचे आयोजन केले. गणपत फुले यांना त्यांच्या आईचे दशपिंड ब्राम्हणाशिवाय करायला सांगितले. ब्राम्हण पुरोहिताशिवाय विवाह सुरु केले. समाजाच्या सदस्यांनी प्रसारासाठी तमाशे, मेळे. जलसे सुरु केले. १८७७ च्या दुष्काळामध्ये समाजाच्या वतीने बालकाश्रम सुरु केला.

**महात्मा फुले यांची ग्रंथसंपदा :**

१) तृतीयरत्न
२) ब्राम्हणांचे कसब
३) छ. शिवाजे राजे भोसले यांचा पोवाडा
४) गुलामगिर
५) अस्पृश्यांची कैफियत
६) शेतकऱ्यांचा आसूड
७) इशारा
८) सत्सार भाग – १
९) सत्सार भाग – २
१०) सार्वजनिक सत्यधर्म

**मूल्यमापन:**

आधुनिक भारताचे पहिले समाजक्रांतिकारक, आद्य दलितोद्धारक असे महात्मा फुले यांनी महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला बदलेल असे समाजकार्य केले. शिक्षण प्रसार विशेषतः स्त्री शिक्षण, अस्पृश्य शिक्षण, जातीभेद, अस्पृश्यता, शेतकरी, अनाथ बालक, गुलामगिरी, सावकारशाही, ब्राम्हणशाही या संदर्भात अभूतपूर्व कार्य केले. त्यांच्या या कार्यात आधुनिक महाराष्ट्राची सुरुवात झाली. फक्त बोलूनच नाही तर प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी समाजकारण केले. मुलींची पहिली शाळा, त्यात शिक्षिका म्हणून स्वतःच्या पत्नीला उभे राहायला शिकवून त्यांनी समाजाला उत्तर दिले. फक्त समाजसुधारणेसाठी त्यांनी अनेकांचा रोष पत्करला व आपले कार्य नेटाने सुरु ठेवले. त्यांच्या या विचारांची कृतीची व धाउसाची आज अजून गरज भासतेय. त्यांनी घेतलेल्या घाडसी निर्णयामुळे आम्ही आज शिक्षण घेऊ शकतोय. त्यांचे हे कार्य आणखी जास्त प्रकाशात यावे म्हणून हा शोधनिबंध अशा या दैदीप्यमान कर्तृत्वाच्या समाजनेत्याचा २८ नोव्हेंबर १८९० मध्ये देहांत झाला व महाराष्ट्राने एक ध्रुवतारा गमवला.

**संदर्भ ग्रंथ:**


1. नरके हरी (संपा); महात्मा फुले समग्र वाङमय आणि चळवळ, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई (२०१३).
2. कीर धनंजय; महात्मा जोतिराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
3. साळुंखे पी. बी. (संपा); महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (१९८२).
4. फडके य.दि.; महात्मा फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई (१९८२).
5. मोरे सदानंद; विद्रोहाचे नाव व्याकरण : महात्मा ज्योतिबा फुले यांचे निवडक साहित्य, प्रकाशन - सकाळ मीडिया प्रा. लि., प्रथम आवृत्ती, एप्रिल, २०१८.